# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे

**शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व शासकीय संगणक लघुलेखन प्रमाणपत्र (SHORTHAND) परीक्षा डिसेंबर - २०२६**

**( व्दितिय सत्र - जुलै २०२६ ते डिसेंबर २०२६)**

**(GOVERNMENT CERTIFICATE IN COMPUTER TYPING BASIC COURSE (GCC-TBC) EXAMINATION AND GOVERNMENT CERTIFICATE IN COMPUTER SHORTHAND EXAM DEC- 2026)**

**(SECOND SEMI. – JULY .2026 TO DECEMBER 2026 )**

पुणे

विद्या गुरुणां गुरुः ।

## *अधिसूचना*
## *व*
## *ऑनलाईन*
## *आवेदनपत्र स्वीकृती कार्यक्रम*


**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे**

व्दारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

**दूरध्वनी क्रमांक : ०२०- २९७०९३९६/२९७०९६९७**

E-mail - mscegcctbc@gmail.com

Website : www.mscepune.in

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (जीसीसी-टीबीसी) व शासकीय संगणक लघुलेखन प्रमाणपत्र (SHORTHAND) परीक्षा डिसेंबर - २०२६.

( व्दितिय सत्र - जुलै २०२६ ते डिसेंबर २०२६)

## परीक्षेशी संबंधित अधिकारी

| अ. क्र. | नांव | पद | मो.क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. नंदकुमार बेडसे | अध्यक्ष | ०२०-२९७०९६१७ |
| २. | श्री. महेश चोथे | आयुक्त | ०२०-२९७०९६१७ |
| ३. | श्रीम्. प्रिया शिंदे | उपायुक्त | ०२०-२९७०९६१७ |
| ४. | श्रीम. मेधा निरफराके | सहाय्यक आयुक्त | ९८५०७३२९८४ |
| ४. | श्रीम्. श्रध्दा वायदंडे | अधीक्षक (जीसीसी - प्रशासन) | ८१८०८१२७०७ |
| ५. | श्रीम्.अर्चना सरदार | मूल्यमापन अधिकारी (जीसीसी - मूल्यमापन) | ९७६६५३४४२० |

ऑनलाईन माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या करीता ०२०-२९-७०९३९६/२९७०९६९७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

## महत्त्वाचे

१) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

२) अधिसूचनेचे व संकेतस्थळावरील सर्व सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करावे.

३) कृतीओघ तक्त्याचे (FlowChart) अवलोकन करुनच आवेदनपत्रे भरावीत.

४) संस्था नुतनीकरण प्रत ऑनलाईन पद्धतीने भरल्याशिवाय विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रे भरता येणार नाहीत.

५) आवेदनपत्र भरताना फोटो, नाव, सही बाबत कोणत्याही प्रकारच्या चुका होणार नाहीत याची दक्षता विद्यार्थ्यांनी व संस्थाचालक यांनी घ्यावी.

६) आवेदनपत्रे भरल्यानंतर ऑनलाईन तात्काळ शुल्क भरणे आवश्यक आहे. यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाणार नाही. ऑनलाईन इंटरनेट बँकीग, क्रेडीट/ डेबीट कार्डाद्वारे विहित मुदतीत शुल्क भरण्याची दक्षता घ्यावी.

(चलन प्रिंट काढन बँकेत जाऊन रक्कम भरण्याचा पर्याय उपलब्ध नाही.)

परीक्षा प्राधान्य

जा. क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./अधिसूचना/ डिसेंबर २०२६/ 326।
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-०४
दिनांक :- 31 /०७/२०२६.

प्रति,

संस्थाचालक / प्राचार्य,
सर्व शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

विषय :- शासकीय संगणक टंकलेखन व लघुलेखन प्रमाणपत्र परीक्षा जुलै २०२६ ते डिसेंबर २०२६ या सत्राकरिता विदयार्थ्यांची नोंदणी अधिसूचना व आवेदनपत्र स्वीकृती करण्याबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे या कार्यालयामार्फत संगणक टंकलेखन व लघुलेखन प्रमाणपत्र परीक्षा वर्षातून दोन सत्रांमध्ये आयोजित करण्यात येते. ०१ जुलै २०२६ पासून व्दितीय सत्र सुरु झालेले असून या सत्राची परीक्षा डिसेंबरच्या दुसऱ्या पंधरवडयामध्ये आयोजित करण्यात येणार आहे. या सत्रासाठी राज्यभरातील सर्व शासनमान्य संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्थाचालकांच्या लॉगिनमध्ये विदयार्थी प्रवेशित करण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यात येत असून प्रवेशाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहिल.

१. डिसेंबर २०२६ अखेर संगणक टायपिंग व लघुलेखनासाठी पुढील विषयांच्या परीक्षा आयोजित करण्यात येत आहेत :-

- संगणक टंकलेखन परीक्षा विषय इंग्रजी - ३०,४०,५०, व ६० शब्द प्रति मिनिट.
- संगणक टंकलेखन परीक्षा विषय मराठी व हिंदी - ३० व ४० शब्द प्रति मिनिट.
- संगणक लघुलेखन परीक्षा विषय इंग्रजी - ६०,८०,१००,१२० व १३० शब्द प्रति मिनिट.
- संगणक लघुलेखन परीक्षा विषय मराठी व हिंदी - ६०,८०,१०० व १२० शब्द प्रति मिनिट.

२. वरील विषयांसाठी संस्थाचालकांना दि . ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत विदयार्थ्यांची सशुल्क नोंदणी करता येईल. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही.

३. या सत्रापासून पहिल्यांदाच नोंदणी केलेल्या प्रत्येक विदयार्थ्याला LMS देण्यात येणार असल्यामळे व त्याचबरोबर प्रत्येक विदयार्थ्याला मोबाईल अटेंडन्स ॲपद्वारे हजेरी नोंदविण्यासाठी सत्राच्या सुरुवातीलाच उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे, यापुढे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने सत्राच्या सुरुवातीलाच विदयार्थ्यांची नोंदणी करणे अनिवार्य राहील.संस्थाचालकांना सुविधा व्हावी यासाठी दि.३० सप्टेंबर २०२६ पर्यंत विदयार्थ्यांची नोंदणी करताना एकूण परीक्षा शुल्क रु.११००/- पैकी रु.५००/- ना परतावा स्वरुपात भरणे बंधनकारक आहे.

४. विदयार्थ्यांना पुढील प्रशिक्षण सुरु ठेवावयाचे असल्यास उर्वरित रक्कम रु.६००/- दि.०१ ऑक्टोंबर २०२६ ते दि.१५ ऑक्टोंबर २०२६ या कालावधीमध्ये भरणे अनिवार्य राहिल. या मुदतीत सदर दुसऱ्या टप्प्यातील रक्कम न भरल्यास विदयार्थ्याला परीक्षेस प्रविष्ट होता येणार नाही, याची सर्व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.

अ) **परीक्षेस पात्र होण्यासाठीचे निकष :**

१. उमेदवार शासनमान्य शाळेतून किमान १० वी उत्तीर्ण असावा.

२. शासनमान्य संगणक टायपिंग संस्थेत नियमित विद्यार्थी म्हणून प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.

**आ) परीक्षेचे वेळापत्रक :**

सदर परीक्षांच्या तारखा यथावकाश परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची संस्थाचालकांनी नोंद घ्यावी

उपरोक्त विषयानुसार शासकीय संगणक टंकलेखन व लघुलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC व SHORTHAND) डिसेंबर -**२०२६** (व्दितिय सत्र - जुलै २०२६ ते डिसेंबर २०२६) या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्कासह आवेदनपत्र भरणेसाठी दि. ३०/०९/२०२६ या तारखेपर्यंत संस्था लॉगिंनमध्ये लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**(महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था - संगणक टंकलेखन व संगणक लघुलेखन)**

| अ.क्र. | तपशील | कालावधी | शुल्क आकारणी |
|---|---|---|---|
| १. | परीक्षेच्या अधिसूचनेपासून | दिनांक ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत | नियमित शुल्क रु ११००/- (प्रति विषय, प्रति विद्यार्थी) पैंकी रु.५००/- पहिला टप्पा. |
| २. | दुसऱ्या टप्प्यातील परीक्षा शुल्कातील रक्कम भरणे. | दि.०१/१०/२०२६ ते दि.१५/१०/२०२६ | नियमित शुल्कातील उर्वरित शुल्क रु.६००/- |

**वरील कालावधीत परीक्षार्थ्यांची आवेदनपत्र भरलेनंतर विद्यार्थ्याच्या नावात,आडनावात, वडिलांच्या/ पतीच्या नावात किंवा आईच्या नावात फक्त स्पेलिंग दुरुस्ती करणेसाठी खालील तक्त्याप्रमाणे ऑनलाईन सशुल्क दुरुस्ती करता येईल.**

| अ.क्र. | तपशील | कालावधी | शुल्क आकारणी |
|---|---|---|---|
| १. | परीक्षा फॉर्म भरण्याची मुदत संपल्यानंतर १५ दिवसांपर्यंत दुरुस्ती लिंक सुरु राहील. | दि.०१/१०/२०२६ ते दि.१५/१०/२०२६ | विनाशुल्क |

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे दि. १९/१०/२०१९ चे परिपत्रकान्वये व या कार्यालयाचे पत्र जा.क्र. १४३७ दि.२७/०३/२०२३ नुसार परीक्षेनंतर संस्थाचालकांनी जुलै - २०१९ व त्या पुढील परीक्षांमधील विद्यार्थ्यांचे नाव, वडिलांचे / पतीचे नाव, आडनाव,आईचे नावाचे स्पेलिंग दुरुस्त्या ह्या प्रस्तावास लागणारी कागदपत्रे पूर्ण केल्यानंतरच करुन देण्यात येईल. सदर प्रस्तावानुसार स्पेलिंग दुरुस्तीमुळे पूर्ण नावात, विद्यार्थ्यांच्या नावात, वडिलांच्या / पतीच्या नावात, आडनावात, आईच्या नावात पूर्ण बदल होत असल्यास अशा दुरुस्त्या करुन दिल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.**

इ) शुल्क भरण्याची पध्दत :-

१. संस्थेने सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या **लिंकवर संस्था लॉगीनद्वारे ऑनलाईन पद्धतीने भरावे.**

२. ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरुन चलन अपडेट झाल्याशिवाय आवेदनपत्र भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही याची नोंद घेण्यात यावी. **(चलनाव्दारे किंवा ऑफलाईन पध्दतीने शुल्क स्विकारले जाणार नाही तसेच इतर कोणत्याही पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्यात येऊ नये, ते ग्राहय धरण्यात येणार नाही व शुल्क परत करण्यात येणार नाही)**

**परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकृतीचा कार्यक्रम :-**

| अ.क्र. | कालावधी | शुल्क प्रकार | शुल्क (रक्कम) रुपये |
|---|---|---|---|
| १. | दिनांक ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत | **परिक्षार्थ्यांचे प्रथम टप्प्यातील शुल्कासह आवेदनपत्र भरणे (ना परतावा)** | रु .५००/- (प्रति विषय, प्रति विद्यार्थी) |
| २. | दि. ०१/१०/ २०२६ ते दि. १५/१०/२०२६ | **परिक्षार्थ्यांचे दुसऱ्या टप्प्यातील शिल्लक शुल्क भरणे** | रु.६००/- (प्रतिविषय, प्रति परिक्षार्थी) |

टिप :- * संस्थाचालकांनी उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी. ऑनलाईन प्रक्रियेमुळे उपरोक्त कोणत्याही टप्प्यावर विलंब होता कामा नये

* ऑनलाईन आवेदनपत्राची एक प्रिंट काढून विद्यार्थ्यांची स्वाक्षरी, संस्थेच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह संबंधित संस्थेने आपल्या दप्तरी जतन करुन ठेवावी.

**ऑनलाईन आवेदनपत्राची एक प्रिंट काढून परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांची दिनांकित स्वाक्षरी - विद्यार्थ्यांनी भरलेली संपूर्ण माहिती अचूक असल्याची खात्री करुन स्वाक्षरी करावयाची आहे, संस्थाचालकाच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह संबंधित संस्थेने आपल्या दप्तरी जतन करुन ठेवावी.**

**उमेदवार नाव दुरुस्ती अथवा दुय्यम प्रमाणपत्राची मागणी करतात तेव्हा संस्थाचालकांच्या शिफारसपत्रासोबत सदर आवेदनपत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने एक प्रत विद्यार्थ्यांना द्यावी.**

ई) बँकेचे चलन वाटप :-

परीक्षा शुल्क केवळ ऑनलाईन पद्धतीने संस्था लॉगिनद्वारे भरावयाचे असल्याने ऑफलाईन चलन देण्यात येणार नाही. **(चलनाने शुल्क भरल्यास ते ग्राह्य धरले जाणार नाही.)**

उ) आवेदनपत्राची उपलब्धता:-

आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर **दि.३०/०९/२०२६ पर्यंत** उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

ऐ) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबत सूचना :-

A. सर्वसाधारण सूचना :-

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरीता प्रथमत: परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळास भेट द्यावी.
२. सदर संकेत स्थळावरील G.C.C.-T.B.C. Exmination वर Click करावे. त्यानंतर स्क्रीनवर Login चा बॉक्स दिसेल त्यामध्ये दिलेली माहिती संस्था कोड व पासवर्ड द्वारे भरावी व Login करावे.
३. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना चुका होऊ नयेत म्हणून संस्थाचालकांनी परीक्षार्थ्यांचा उपस्थितीत आवेदनपत्र अचूक भरावे.
४. **आवेदनपत्र भरलेल्या परीक्षार्थ्यांची यादी दिसेल.**
५. आवेदनपत्र भरताना अंध परीक्षार्थ्यांबाबत सनेत्रवाचक (मदतनीस) हवा असल्यास सनेत्र वाचकाची माहिती अचूक भरावी.
६. **अंध दिव्यांग विद्यार्थ्यांशिवाय इतर दिव्यांग प्रकारांसाठी आवेदनपत्रात 'इतर दिव्यांग'**(Other Disability) असा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
७. परीक्षा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या जीसीसी-टीबीसी परीक्षांचे आवेदनपत्र भरल्यानंतर परीक्षा परिषदेकडून त्यातील माहीती नुसारच प्रवेशपत्र निर्गमित केली जातात.
८. परीक्षेनंतर नावांमधील स्पेलिंग दुरुस्त्या तसेच पूर्ण नाव दुरुस्तीचे, विषय दुरुस्तीचे प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त होतात. याचाच अर्थ संस्थाचालकांकडून आवेदनपत्र भरताना पुर्णपणे दक्षता घेतली जात नाही असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी सदर बाबत दक्षता घ्यावी.
९. वरील प्रकारच्या चुका होऊ नयेत यासाठी संस्थाचालकांनी आवेदनपत्र भरताना विद्यार्थ्यांची आवश्यक ती माहिती विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रावरुन (शाळा सोडल्याचा दाखला / शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र १० वी / १२ वी गुणपत्रक / प्रमाणपत्र) पडताळणी करुन आवेदनपत्र भरावेत.
१०. **इंग्रजी ५० व ६० श.प्र.मि. विषयासाठी आवश्यक पूर्वअट पूर्ततेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**
**संदर्भ - शासन परिपत्रक क्रमांक :- संकीर्ण २०१६/प्र.क्र.११/एस.डी-२, दि. २४/०४/२०१७ चे शासन परिपत्रकानुसार पूर्वअट पुर्तता करणे आवश्यक राहील.**

| SR.NO. | NAME OF THE SUBJECT | SUBJECT CODE | PRECONDITION REQUIRED |
|---|---|---|---|
| 1. | GCC-TBC ENG.50 W.P.M. | ENG. 50 = 17 | ENGLISH 30 W.P.M. |
| 2. | GCC-TBC ENG.60 W.P.M. | ENG. 60 = 18 | |

ओ) संस्थाप्रमुख व परीक्षार्थी यांच्यासाठी महत्त्वाच्या सुचना:-

१. **संस्थाचालकांनी आवेदनपत्र भरण्यापूर्वी नुतनीकरण आदेशाची अद्ययावत प्रत अपलोड करणे बंधनकारक आहे.**
२. सदर परीक्षा ही संगणक टंकलेखन व लघुलेखन प्रमाणपत्र परीक्षा मराठी, हिंदी, इंग्रजी सर्व गती विषयांसाठीची आहे.
३. विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठीचे LMS Software उपलब्ध करुन देण्यात येत आहे. (केवळ संगणक टंकलेखन परीक्षेसाठी)
४. संगणक टंकलेखन ३० व ४० विषयांसाठी एकाच वेळी आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे.
५. **मराठी, हिंदी, इंग्रजी ४० श.प्र.मि. विषयाचे आवेदनपत्र भरत असताना ३० श.प्र.मि या विषयाचा तपशील भरणे आवश्यक आहे.**
६. **संस्थेने आपल्या संस्थेतील परीक्षार्थ्यांचे आवेदनपत्र (Application From) पुर्ण भरल्यानंतरच आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी. नाव, विषय, गती, सही, फोटो बरोबर, असल्याची खात्री करुन विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. सदर आवेदनपत्राची प्रत संस्थेत जतन करुन ठेवावी.**

प्रवेशपत्र निर्गमित झाल्यानंतर वा परीक्षेनंतर कोणताही बदल केला जाणार नाही. संगणकीय / मुद्रण दोषामुळे चूक झाल्यास जतन केलेल्या आवेदनपत्राची प्रत सादर केल्यानंतरच प्रमाणपत्रावर दुरुस्ती केली जाईल.

७. गुण पडताळणीसाठी अर्ज केलेल्या अनुत्तीर्ण परीक्षार्थ्यांच्या गुणपडताळणीचा निकाल अप्राप्त असेल, तर गुणपडताळणीच्या निकालाची वाट न पाहता विहित मुदतीत पुनर्परीक्षार्थी म्हणून ऑनलाईन आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाणार नाही.

८. कोणत्याही कारणामुळे या पूर्वीच्या परीक्षेचा निकाल राखीव असल्यास राखीव निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीतच अशा विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र पुनर्परीक्षार्थी म्हणून भरता येईल. राखीव निकाल उशीरा प्राप्त झाला, या सबबीखाली स्वतंत्र कालावधी मिळणार नाही.

९. मागील परीक्षांमधील (GCC/ GCC-TBC/GCC - Computer Shorthand) गैरप्रकार प्रकरणी येणाऱ्या परीक्षेस प्रतिबंध - डिबार) केलेल्या परीक्षार्थ्यांचे आवेदनपत्र भरु नये. त्याबाबतची खात्री संस्थाचालकांनी करावी. अशा विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र संस्थाचालकांनी भरल्यास सदर संस्थेची हि कृती गंभीर व नियमबाहय समजण्यात येईल.

१०. विद्यार्थी उच्चीकरणासाठी प्रविष्ठ होत असेल तर प्रवेशपत्रावर तसे स्पष्टपणे नमूद करण्यात येईल. तसेच उच्चीकरणावेळी सदर परीक्षेचा निकाल अनुत्तीर्ण आल्यास पूर्वीच्या विषयांचा निकाल देखिल अनुत्तीर्ण घोषित करण्यात येईल.

११. परीक्षार्थी संगणक टायपिंगच्या ३० व ४० श.प्र.मि.या विषयांसाठी परीक्षेस प्रविष्ठ होणार असल्यास संबंधित परीक्षार्थ्यांचे एकच आवेदनपत्र भरण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

१२. सदर परीक्षेसाठी आवेदनपत्र भरताना LIVE WEB ने विद्यार्थ्यांचा Photo capture करुन अपलोड करावा.

१३. आवेदनपत्रावर सही सोबतचा फोटो हा पासपोर्ट आकाराचा रंगीत आणि नुकताच काढलेला असावा. जुना, शालेय, बालपणीचा फोटो चालणार नाही. पासपोर्ट आकाराचा फोटो आणि वेब कॅमेराने कसढलेल्या फोटोमध्ये तफावत आढळता कामा नये. तसेच फोटोसह सही व फक्त सही JPEG ३० to ५० KB पर्यंत Upload करावी.

१४. फोटो काढलेल्या ठिकाणी म्हणजेच लोकेशन तपासण्याच्या दृष्टीने वेब कॅमेराने काढलेला फोटो मान्यता मिळालेल्या स्वत: च्या संस्थेच्या कार्यालयात काढलेलाच असावा. इतरत्र काढलेला चालणार नाही. वेब फोटो अतिशय स्वच्छ प्रकाशात काढलेला, स्पष्ट दिसेल असाच असावा.

१५. परीक्षार्थ्यांना संगणक टंकलेखन परीक्षेमध्ये शक्यतो संस्थेच्या जवळचे परीक्षा केंद्र परीक्षा परिषदेकडून दिले जाईल.मात्र परीक्षेची सुरक्षितता, कमी विद्यार्थी संख्या, आवश्यक साधनसामग्रीची उपलब्धता न होणे या बाबींमुळे अन्य/ दूरचे परीक्षा केंद्र दिले जाऊ शकते. परीक्षा परिषदेच्या स्तरावरुन देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल केले जाणार नाही.संगणक लघुलेखन परीक्षेसाठी अल्प विदयार्थी संख्या लक्षात घेता जिल्हयाच्या ठिकाणी परीक्षा केंद्र देण्यात येईल. अपवादात्मक प्रसंगी जिल्हा मुख्यालयी परीक्षा केंद्र उपलब्ध न झाल्यास लगतच्या तालुक्यात/जिल्हयात परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देण्यात येईल.

१६. परीक्षार्थ्यांचे आवेदनपत्र भरताना संस्थाचालकांनी परीक्षार्थ्यांचा ई-मेल आयडी व व्हॉटस्ॲप नंबर नमूद करावा. संस्थाचालकांनी कोणत्याही परिस्थितीत स्वत:चा ई-मेल आयडी व मोबाईल नंबर देऊ नये.

१७. परीक्षेपूर्वी अंदाजे ५ दिवस अगोदर पात्र परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे (हॉल तिकिट) संस्थांना परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर संस्थांच्या लॉगिनमध्ये ऑनलाईन दिली जातील. त्यानुसार संस्थांनी आपल्या संस्थेतील सर्व परीक्षार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर विद्यार्थ्यांचा अद्ययावत पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो चिकटवून फोटोवर संस्थाचालकांनी संस्थेचा अर्धा शिक्का व स्वाक्षरीसह विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र वितरीत करणे बंधनकारक राहील.

१८. परीक्षार्थींनी भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही याची उमेदवारांनी व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी. त्यामुळे अतिरिक्त शुल्क भरण्यात येवू नये.

१९. परीक्षा शुल्काच्या ऑनलाईन पावतीवर दिनांक, संस्थेचे नाव व सांकेताक असल्याची खात्री करावी.

२०. **दिव्यांग (अंध) विद्यार्थ्यांबाबत** :- अंध विद्यार्थ्यांना इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षेस मदतनीस (सनेत्र वाचक) घेऊन बसण्यासाठी शासनाने शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि. १०/१०/२००१ नुसार मान्यता दिलेली आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांना सनेत्र (मदतनीस) वाक्य, शब्द वाचल्यानंतर ते टंकलिखित करण्यास उशीर लागण्याची शक्यता लक्षात घेऊन टंकलेखन परीक्षेच्या विभाग दोन साठी (गती उतारा) ७ मिनिटांऐवजी १० मिनीटे म्हणजेच ३ मिनिटे अतिरिक्त वेळ दण्यास शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि.३१ डिसेंबर २००१ नुसार मान्यता दिलेली आहे. ही सवलत GCC-TBC परीक्षेसाठीही लागू राहील.

२१. **दिव्यांग विद्यार्थ्यांबाबत** :- ४० % टक्के किंवा त्याहून अधिक कायम स्वरुपी दिव्यांगत्व आलेले असल्यास व जिल्हा शल्य चिकित्सकांनी (जिल्हा सिव्हिल सर्जन) तसे प्रमाणीत केलेले असल्यास ३० श.प्र.मि. गतीची परीक्षा, या टंकलेखनाच्या परीक्षेतील गती उताऱ्यासाठी दिव्यांग उमेदवारास ७ मिनिटांऐवजी १० मिनीटे म्हणजेच ३ अधिक मिनीटांची सवलत देण्यास शासनाने, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. परीक्षा -२०१५/प्र.क्र.२७२/एस.डी.२,दि. २० ऑक्टोबर २०१६ नुसार मान्यता दिलेली आहे. ही सवलत GCC-TBC परीक्षेसाठीही लागू राहील.

२२. आवेदनपत्रात खोटी माहिती देणे, आवेदनपत्रासोबतच्या दस्तऐवजात खाडाखोड करुन सादर करणे या कारणांमुळे उमेदवार परीक्षेसाठी कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल व त्याची / तिची सदर परीक्षेची संपादणूक रद्द होईल. तसेच संबंधित संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.

२३. **परीक्षार्थी, संस्थाचालक यांनी आवेदनपत्रावरील Submit या बटनावर क्लिक करण्यापूर्वी आवेदनपत्रामधील आवश्यक असलेले सर्व रकाने बरोबर भरले असल्याची खात्री करावी.**

२४. संस्थाचालकांनी संस्था नुतनीकरण न करता विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ करु नयेत. विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट केल्याचे निदर्शनास आल्यास आपल्या संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.

२५. परीक्षार्थींचे एक विषयासाठी एकच आवेदनपत्र भरावे. एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे भरल्यास त्या विषयाची सर्व आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील, याबाबत गांभीर्याने नोंद घ्यावी. परीक्षार्थींनी एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे त्याच किंवा इतर संस्थेमधून भरली नसल्याची संस्थाप्रमुखांनी खात्री करावी. तसे हमीपत्र परीक्षार्थ्यांकडून घेऊन आपल्या दप्तरी ठेवावे.

**तसेच एका सत्रासाठी एका विद्यार्थ्यास संगणक टंकलेखन किंवा लघुलेखन परीक्षेमध्ये चार पेक्षा जास्त विषयांना प्रविष्ठ होता येणार नाही.**

२६. संस्थाप्रमुखांने कोणत्याही अनधिकृत संगणक टंकलेखन संस्थेच्या परीक्षार्थ्यांचे आवेनदनपत्र आपल्या संस्थेमार्फत भरु नयेत. तसे निदर्शनास आल्यास सदर भरलेली सर्व ऑनलाईन आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील व आपल्या संस्थेची शासन मान्यता काढून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

२७. विद्यार्थी /संस्थाचालक यांनी आवेदनपत्रात नमूद केलेली माहिती चुकीची आढळल्यास सदर विद्यार्थ्याचा निकाल कोणत्याही टप्प्यावर रद्द केला जाईल.

२८. विद्यार्थ्यांचे बॅच बदल, विषय बदल याबाबतचे ई-मेलव्दारे **अथवा प्रत्यक्ष/ समक्ष प्राप्त होणरे प्रस्ताव/अर्ज यांची दखल घेतली जाणार नाही.**

**जानेवारी - २०२६ परीक्षेपासून बॅच बदलसाठी संस्था लॉगीनव्दारे स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.**

२९. संपूर्ण माहिती पुन्हा वाचून खात्री केल्यानंतर Submit या बटनावर Click करावे. Submit केलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी. त्यावर विद्यार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन नाव व संस्था कोडलिहावा व आपल्या दप्तरी जपून ठेवावी.

३०. आपल्या संस्थेतील सर्व परीक्षार्थ्यांचे दोन्ही टप्प्यातील शुल्क भरल्यानंतर ऑनलाईन प्रिंटवर (पावती ) Transaction ID Successfully दिनांक, संस्थेचे नांव व संस्थेचा कोड (सांकेतांक) व ID असल्याची खात्री करावी.

**टिप :- या पत्रासोबत शासन परिपत्रक क्रमांक :- संकीर्ण -२०१६/प्र.क्र.११/एसडी-२ , दि.२४/०४/२०१७ च्या पूर्वअट पूर्तता विवरण तक्ता देण्यात येत आहे. सदरील तक्त्यानुसार पूर्वअट पूर्तता केलेल्याच विदयार्थ्यांची आवेदनपत्र भरणेबाबतची दक्षता घ्यावी.**

**(महेश चौथे)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-४११ ००४**

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव:-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व, महाराष्ट्र राज्य.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद सर्व, महाराष्ट्र राज्य.
३. शिक्षण निरीक्षक, बृहमुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)

**प्रत माहितीस्तव सविाय सादर:-**

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

## सुधारित विवरणपत्र - अ

### इंग्रजी / मराठी / हिंदी टंकलेखन

| विषय | गती | विषय कोड | सुधारित पूर्वअट |
|---|---|---|---|
| इंग्रजी | टंकलेखन ३० श.प्र.मि. | १० | पूर्व अट नाही |
| | टंकलेखन ४० श.प्र.मि. | ११ | पूर्व अट नाही |
| | टंकलेखन ५० श.प्र.मि. | १२ | इंग्रजी टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. |
| | टंकलेखन ६० श.प्र.मि. | १३ | इंग्रजी टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. |
| मराठी | टंकलेखन ३० श.प्र.मि. | २१ | पूर्व अट नाही |
| | टंकलेखन ४० श.प्र.मि. | २२ | पूर्व अट नाही |
| हिंदी | टंकलेखन ३० श.प्र.मि. | ३१ | पूर्व अट नाही |
| | टंकलेखन ४० श.प्र.मि. | ३२ | पूर्व अट नाही |

## सुधारित विवरणपत्र - ब

### इंग्रजी / मराठी / हिंदी संगणक टंकलेखन (GCC - TBC)

| विषय | विषय व गती | विषय कोड | सुधारित पूर्वअट |
|---|---|---|---|
| इंग्रजी | बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ३० श.प्र.मि. | १५ | पूर्व अट नाही. |
| | बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४० श.प्र.मि. | १६ | पूर्व अट नाही. |
| मराठी | बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० श.प्र.मि. | २५ | पूर्व अट नाही. |
| | बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ४० श.प्र.मि. | २६ | पूर्व अट नाही. |
| हिंदी | बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग हिंदी ३० श.प्र.मि. | ३५ | पूर्व अट नाही. |
| | बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग हिंदी ४० श.प्र.मि. | ३६ | पूर्व अट नाही. |
| | स्पेशल स्कील इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर अँन्ड स्टुडन्ट | ४५ | इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी / हिंदी टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. किंवा संगणक टंकलेखन इंग्रजी ४० श.प्र.मि. व मराठी / हिंदी संगणक टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. |

## सुधारित विवरणपत्र - क

## इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन

| विषय | विषय व गती | विषय कोड | सुधारित पूर्वअट |
|---|---|---|---|
| इंग्रजी | लघुलेखन ६० श.प्र.मि. | ५० | इंग्रजी टंकलेखन किमान ३० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. |
| | लघुलेखन ८० श.प्र.मि. | ५१ | इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १०० श.प्र.मि. | ५२ | इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १२० श.प्र.मि. | ५३ | इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १३० श.प्र.मि. | ५४ | इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १४० श.प्र.मि. | ५५ | इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १५० श.प्र.मि. | ५६ | इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १६० श.प्र.मि. | ५७ | इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| मराठी | लघुलेखन ६० श.प्र.मि. | ६० | मराठी टंकलेखन किमान ३० श.प्र.मि.किंवा मराठी संगणक टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. |
| | लघुलेखन ८० श.प्र.मि. | ६१ | मराठी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा मराठी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १०० श.प्र.मि. | ६२ | मराठी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा मराठी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १२० श.प्र.मि. | ६३ | मराठी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा मराठी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| हिंदी | लघुलेखन ६० श.प्र.मि. | ७० | हिंदी टंकलेखन किमान ३० श.प्र.मि.किंवा हिंदी संगणक टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. |
| | लघुलेखन ८० श.प्र.मि. | ७१ | हिंदी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा हिंदी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि.व हिंदी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १०० श.प्र.मि. | ७२ | हिंदी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा हिंदी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि.व हिंदी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १२० श.प्र.मि. | ७३ | हिंदी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा हिंदी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि.व हिंदी लघुलेखन ६० श.प्र.मि. |

१) उमेदवार एकाच वेळी इंग्रजी / मराठी / हिंदी टंकलेखन ३० व ४० श.प्र.मि. टंकलेखन परीक्षेसाठी बसू शकेल.

२) उमेदवार एकाच वेळी इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन ८० व १०० श.प्र.मि. किंवा १०० व १२० श.प्र.मि. परीक्षेसाठी बसू शकेल.

३) उमेदवाराने शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून इंग्रजी / मराठी / हिंदी टंकलेखन अथवा लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण असल्यास त्यास उच्चस्तर श्रेणी परीक्षेस बसता येईल.

**********

# ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कृतीओघ तक्ता (Flow Chart)

## नियमित (REGULAR)

www.mscepune.in संकेतस्थळाला भेट देणे.

⇩

GCC- TBC EXAMINATION या Tab वर क्लिक करा.

⇩

ID व Password द्वारे Login करा.

⇩

GCC-TBC Tab वर क्लिक करणे

⇩

संगणक टायपिंग नुतनीकरण आदेश UPLOAD करणे.

⇩

GCC-TBC Application form वर क्लिक करणे

⇩

सर्व परीक्षार्थ्यांची माहिती अचूक भरल्याची पुन्हा खात्री करुनच Submit बटनावर क्लिक करा.

⇩

भरलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून त्यावर परिक्षार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन दप्तरी जपून ठेवावी.

⇩

GCC-TBC Online Payment Tab वर क्लिक करुन विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने संस्था लॉगीनद्वारे परीक्षा शुल्क भरावे.(पहिला टप्पा - रु.५००/-) (दुसरा टप्पा - रु.६००/-)

⇩

सर्व परीक्षार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन दुसऱ्या टप्प्यातील शुल्क भरणा केल्यानंतरच Exam Candidates list ची प्रिंट घ्यावी.

# ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कृतीओघ तक्ता (Flow Chart)

## पुनर्परिक्षार्थी (REPEATAR)

www.mscepune.in संकेतस्थळाला भेट देणे.

⇩

GCC - TBC Examination या Tab वर क्लिक करा.

⇩

ID व Password द्वारे Login करा.

⇩

GCC-TBC Tab वर क्लिक करा.

⇩

संगणक टायपिंग नुतनीकरण आदेश UPLOAD करणे.

⇩

GCC-TBC Application Form Repeater वर क्लिक करावे.

⇩

Candidates List समोरील Apply बटनावर क्लिक करून त्यामधील मुद्देनिहाय अचूक माहिती भरा.

⇩

Apply केलेल्या सर्व परीक्षार्थ्यांच्या यादीचे अवलोकन करणे.

⇩

भरलेल्या आवदेनपत्राची प्रिंट काढून त्यावर परीक्षार्थी संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन दप्तरी जपून ठेवावी.

⇩

GCC-TBC Online Payment Tab वर क्लिक करुन विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने संस्था लॉगीनद्वारे परीक्षा शुल्क भरावे.(रिपीटरसाठी संपुर्ण शुल्क रु.११००/- एकाच टप्प्यात दि.३०/०९/२०२६ पर्यंत भरणे बंधनकारक आहे.)

⇩

सर्व रिपीटर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरून झाल्यानंतरच Exam Candidates list ची प्रिंट घ्यावी

परीक्षा विद्यार्थी यादी नमुना

# G.C.C. COMPUTER TYPING AND SHORTHAND EXAMINATION DECEMBER -2026 Candidate list

PAGE NO. :

NAME OF THE INSTITUTE : ____________________

INSTITUTE CODE NO.:

*USE CODE NUMBERS ONLY (To be filled in by the Head of the Institute)

| Sr. No. | Name Of The Candidate | Form No. | Instt. Gen. Registe No. | Subject Code No. | Signature Of Candidate |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

This is to Certify that the above enlisted candidates are the bonafide students of this Institute. They have fulfilled all the conditions required for appearing at the GCC- TBC Examination as per the rules and each candidates has signed personally.

* **Subject Code :- COMPUTER TYPING** **1) English GCC-TBC 30 W.P.M. = 15 2) English GCC-TBC 40 W.P.M. = 16 3) English GCC-TBC 50 W.P.M. = 17**
**4) English GCC-TBC 60 W.P.M. = 18**
**1) Marathi GCC-TBC 30 W.P.M. = 25 2) Marathi GCC-TBC 40 W.P.M. = 26**
**1) Hindi GCC-TBC 30 W.P.M. = 35 2) Hindi GCC-TBC 40 W.P.M. = 36**

**SHORTHAND -** **1) ENGLISH – 60 , 80 , 100, 120 , 130 W.P.M.**
**2) MARATHI AND HINDI – 60,80,100,120 W.P.M.**

SEAL OF THE INSTITUTE
Phone No.---------------------------
E-mail Id. ---------------------------

SIGNATURE
HEAD OF THE INSTITUTE